आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, ११ मे २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : २९ । पाने : ४ । मूल्य २ ₹



मानवतावादी विचारांचे पुरस्कर्ते, थोर समाजसुधारक, अंधश्रद्धेवर प्रहार करणारे महान विचारवंत
**महात्मा बसवेश्वर**
यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांना
**त्रिवार अभिवादन!**

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# कोरोनामुक्तीनंतरही म्युकरमायकोसीसचा सामना ; माजलगावात पहिला रूग्ण

▶ प्रतिनिधी

माजलगाव : कोरोनातून बरे झालेल्या मात्र रोग प्रतिकार शक्ती कमी झालेल्या रूग्णांना अचानक डोके दुखणे, डोळा सुजणे, नजर कमी होणे, दात दुखणे, जबडा दुखणे, डबल दिसणे अशी लक्षणे दिसून आली तर त्यांनी तात्काळ वैद्यकीय उपचार घेण्याचा सल्ला नेत्ररोग तज्ञ डॉ.स्वानंद कुलकर्णी यांनी दिला आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतून मुक्त झालेल्या रूग्णांना शरीरात बुरशीजन्य जंतूचा संसर्ग होवून फंगल इन्फेक्शन होत आहे. याला म्युकरमायकोसिस असे म्हटले जाते. कोरोनानंतर कमी झालेली प्रतिकार शक्ती सोबतच अनियंत्रित मधुमेह हे त्याचे मुख्य कारणे आहेत. यात नाकाद्वारे, सायनसद्वारे संक्रमण होते. पुढे ते तोंडाच्या आतुन वरचा जबडा, डोळे व मेंदूपर्यत पोहचते. वेळ प्रसंगी डोळा निकामी, पॅरेलेसेस व मृत्यु ओढावतो. हा आजार अत्यंत गंभीर असून त्याचा मृत्यु दर ६० टक्के पर्यंत आहे. त्यामुळे कोरोनामुक्त झालेल्या रूग्णांनी सदरिल लक्षणे असतील तर त्यांनी तात्काळ वैद्यकीय उपचार घ्यावेत. असे डॉ.स्वानंद कुलकर्णी यांनी म्हटले.



### या आजारावर होणार मोफत उपचार : राजेश टोपे

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये कोरोना रूग्ण म्युकरमायकोसीस या बुरशीजन्य आजाराने ग्रस्त असून त्याची गंभीर दखल आरोग्य विभागाने घेतली आहे. या आजाराच्या जाणीव-जागृतीसाठी मोहीम हाती घेण्यात येणार असून म्युकरमायकोसीसच्या रूग्णांवर महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून मोफत उपचार करण्यात येतील, अशी माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली आहे. जालना येथे माध्यम प्रतिनिधींनीशी संवाद साधताना आरोग्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. यासंदर्भात माहिती देतांना राजेश टोपे यांनी सांगितले की, ज्या कोरोना रूग्णांना मधुमेह आहे आणि त्यांचा मधुमेह नियंत्रित नाही त्यांच्यामध्ये म्युकरमायकोसीस या बुरशीजन्य आजाराचे लक्षण आढळून येत आहे.

# संकटकाळी सच्चा शिवसैनिक धावतो

## नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे गौरवोद्गार; अंथरवणपिंप्रीत कोविड सेंटरचे उद्घाटन

▶ प्रतिनिधी

बीड : शिवसेनाप्रमुखांनी आम्हा शिवसैनिकांना संकटाच्या काळात लोकांच्या मदतीला धावून जाण्याची शिकवण दिली आहे. संकटकाळात सच्चा शिवसैनिक लोकांच्या मदतीला धावून जातो. हे बीड जिल्हा शिवसेनाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी आपल्या कृतीतून सिध्द केले आहे, असे गौरवोद्गार राज्याचे नगरविकास तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. मंत्री शिंदे हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना बोलत होते.

शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी बीडपासून जवळच असलेल्या अंथरवणपिंप्री येथे उभारलेल्या ५०० बेडच्या स्व.बाळासाहेब ठाकरे कोविड केअर सेंटरचे उद्घाटन शिवसेना नेते तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि शिवसेनेचे सचिव मिलिंद नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी झाले. यावेळी बोलताना मंत्री एकनाद शिंदे म्हणाले की, राज्यावर कोरोनाचे महाभयंकर संकट आले आहे. या संकटावर मात करण्यासाठी राज्य सरकार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली प्रयत्नांची पराकाष्टा करत आहे. दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांनी प्रचंड गांभीर्याने आजची परिस्थिती हाताळली आहे. कोविड लसीकरणात महाराष्ट्र आघाडीवर आहे. आता काही जिल्ह्यात रूग्णांचा आकडा कमी होत आहे.



बीड जिल्ह्यातही शासन-प्रशासन चांगले काम करत आहे. शिवसेनाप्रमुखांनी आम्हा शिवसैनिकांना संकटाच्यावेळी सर्वसामान्यांच्या मदतीसाठी धावून जाण्याची शिकवण दिली. त्या शिकवणीतून शिवसैनिक ठिकठिकाणी कोरोनाकाळात काम करत आहे. इथेही कुंडलिक खांडे यांनी कोविड सेंटर उभारून शिवसेनाप्रमुखांचा सच्चा शिवसैनिक असल्याचे दाखवून दिले आहे. बीड जिल्ह्यात ऑक्सिजन अथवा अन्य कुठल्याही गोष्टींची कमतरता कमी पडू देणार नाही असे आश्वासन राज्याचे नगरविकास तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. यावेळी फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे पाटील, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, अर्जुन खोतकर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बदामराव पंडित, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, सचिन मुळूक, सुरेश नवले, नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, माजी जिल्हाप्रमुख बाळासाहेब पिंगळे, उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब आंबुरे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख संगिता चव्हाण आदींची उपस्थिती होती. यावेळी मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपस्थित सर्वांनी या कोविंड सेंटरची पाहणी केली. त्या ठिकाणी रूग्णांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती घेतली.

### मागणी करताच दिली मंजूरी

मंत्री एकनाथ शिंदे हे बीड दौऱ्यावर आले असतांना बीड नगरपालिकेच्या वतीने नगराध्यक्ष डॉ.भारतभुषण क्षीरसागर यांनी त्यांच्याकडे ऑक्सीजन प्रकल्प व विद्युत दाहिनीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. मागणी करताच अवघ्या काही मिनीटांमध्ये एकनाथ शिंदे यांनी या दोन्ही बाबींसाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला.

## फास्टट्रॅकन्यूज

### काँग्रेसला मिळणार २३ जूनला नवा राष्ट्रीय अध्यक्ष



दिल्ली : काँग्रेस अध्यक्षपदाचा अखेर मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी येत्या जून महिन्यातील २३ तारीख निश्चित झाली आहे. काँग्रेस कार्यसमितीच्या बैठकीत संघटनेचे महासचिव केसी वेणुगोपाल यांनी निवडणूक तारखेची घोषणा केली आहे. सध्या काँग्रेसचे हंगामी अध्यक्षपद सोनिया गांधी यांच्याकडे आहे. त्यामुळे या निवडणुकीच्या शर्यतीत कोण असेल याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### पालकमंत्री धनंजय मुंडे बीडमध्ये तळ ठोकून



बीड : कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी बीडच्या प्रशासन व्यवस्थेने कंबर कसली आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे बीडमध्ये तळ ठोकून कोरोनावरील उपाययोजनांचा आढावा घेत आहेत. पालकमंत्री धनंजय मुंडेंनी जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यासोबतही चर्चा केली. तसेच शहरातील आयटीआय सेंटरमध्ये उभारण्यात येत असलेल्या शंभर खाटांच्या कोविड सेंटरची पाहणी केली.

### शिष्यवृत्ती परीक्षेला मिळेना मुहूर्त

मुंबई : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणारी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. दि.२३ मे रोजी होणारी परीक्षा लांबणीवर टाकण्यात आली आहे. यापूर्वी २५ एप्रिलला होणारी परीक्षा कोरोनामुळे २३ मे रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी पाचवी आणि आठवीची माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा लांबणीवर टाकल्याची घोषणा केली आहे.

### अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनवर एम्समध्ये उपचार सुरू

नवी दिल्ली : कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनने कोरोनाने मृत्यू झाल्याचे वृत्त झळकले होते, पण तो जिवंत असल्याचा खुलासा एम्स रूग्णालयाच्या प्रशासनाने केला आहे. छोटा राजनवर कोविड संसर्गाच्या उपचारांसाठी अलीकडेच एम्स रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. छोटा राजन तिहार तुरुंगात असतानाच कोरोना झाला होता. त्याचा अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात त्याला रूग्णालयात दाखल करण्यात आले.

### बुडणाऱ्या पुत्रास वाचवताना मातेचाही करूण अंत

गेवराई : धुणे धुण्यासाठी आईसोबत गेलेला तिचा पाच वर्षाचा मुलगा नदीकाठी खेळत असताना त्याचा अचानक तोल गेला व तो नदीपात्रात पडला. त्याला वाचविण्यासाठी आईने नदीपात्रात उडी घेतली. मात्र, या घटनेत आईसह मुलाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गेवराई तालुक्यातील संगम जळगाव येथे गोदावरी नदीपात्रात रविवारी सकाळी दहा वाजेदरम्यान घडली. पल्लवी गोकुळ ढाकणे (वय २६ वर्षे) आणि तिचा मुलगा समर्थ गोकुळ ढाकणे (वय ५ वर्षे) दोघे रा.संगम जळगाव अशी माय-लेकाची नावे आहेत.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !









संपादकीय

# टिळक विद्यापीठचा शतकोत्सव

एखाद्या संस्थेचे शंभर वर्ष पूर्ण होणे हा मोठा पल्ला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठानेही गुरुवारी शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महान कार्य या संस्थेने केले आहे. विद्यापीठाची वाटचाल लोकमान्य टिळकांच्या गीता रहस्यात सांगितलेल्या निष्काम कर्मयोगावर व राष्ट्रीय शिक्षणावर आधारलेली आहे. आजच्या एकविसाव्या शतकात ज्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची आपण चर्चा करत आहोत, ते आंतरशाखीय शिक्षण टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये शंभर वर्षांपूर्वी समाविष्ट करण्यात आले होते. पत्रकारिता हे अतिशय प्रभावी माध्यम आहे. तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता कौशल्य संपादन केलेल्या मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. ही गरज लक्षात घेऊन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने पत्रकारितेचे दूर शिक्षण पद्धतीचे आणि बहिस्थ पद्धतीचे अभ्यासक्रम २०००मध्ये सुरू केले. त्यामध्ये वृत्तपत्रविद्या प्रमाणपत्र, वृत्तपत्रविद्या पदवी आणि डिप्लोमा यांचा समावेश होता. हे अभ्यासक्रम प्रथम पुणे, अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा अशा शहरांत सुरू करण्यात आले. केसरीच्या आवृत्त्या जिथून निघत होत्या, अशा केंद्रांतील विद्यार्थ्यांना तेथील आवृत्ती कार्यालयातून प्रशिक्षणाची सुविधा पुरविण्यात येत होती. साहजिकच विद्यार्थ्यांना वृत्तपत्राचे कामकाज कसे चालते, याची बारकाईने माहिती मिळत होती. त्यामुळे या अभ्यासक्रमाला पहिल्यापासून चांगला प्रतिसाद मिळत गेला. मुद्रित माध्यमाप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, त्यादृष्टीने अभ्यासक्रमात ते विषय समाविष्ट करण्यात आले. २००४मध्ये विद्यापीठाने वृत्तपत्रविद्या पारंगत हा अभ्यासक्रम सुरू केला. त्यात टेलिव्हिजन, रेडिओ या माध्यमांविषयी विद्यार्थ्यांना माहिती व्हावी म्हणून ते विषय समाविष्ट करण्यात आले. मानवाच्या प्रगतिशील जीवनाचे प्रतीक म्हणून प्रत्येक देशात कलेला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. कला फक्त चित्र आणि शिल्प या दोन माध्यमांतून प्रकट होते असे नाही; तर ती लेखन, काव्य, गायन, वादन, नर्तन, अभिनय, वाचन, सादरीकरण अशा विविध माध्यमांतून सादर होताना आपण पाहतो. या वाढत्या उद्योगक्षेत्रासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ सुद्धा अपुरे पडताना दिसते. ही गरज लक्षात घेऊन टिळक विद्यापीठाने एक परिपूर्ण कोर्स डिझाईन' करून समाजाची ही गरज पूर्ण करण्यासाठी पाऊल उचलले. २००६मध्ये बॅचलर ऑफ फाईन आर्टस् (बी.एफ.ए.) हा विभाग सुरू करण्यात आला. ॲनिमेशन, व्हिएफक्स, गेम डिझाईन हे अभ्यासक्रम या विभागाअंतर्गत सुरू करण्यात आले. २०१९मध्ये बॅचरल ऑफ फाईन आर्टस या विभागाचे नाव डिपार्टमेंट ऑफ डिजिटल आर्टस् असे बदलण्यात आले. २०११ ते २०२० हे दशक माध्यम क्षेत्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण मानले जाते. सर्वच नवी माध्यमे आणि मोबाईल तंत्रज्ञान नवे नवे टप्पे गाठत जनसंपर्क आणि संवादाचे एक प्रमुख साधन बनून गेले. २०११ मध्ये जनसंवाद आणि पत्रकारिता या स्वतंत्र विभागाची स्थापना झाली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ हे भारतातील मोजक्या विद्यापीठांमधील एक आहे. जे डिजिटल चित्रपट निर्मिती, फोटोग्राफी, ध्वनिमुद्रण, ब्रॉडकास्ट जर्नालिझम अशा विषयांमध्ये पदवी अभ्यासक्रम देत आहे. तसेच ॲडव्हान्स डिप्लोमा इन साऊंड रेकॉर्डिंग, ॲडव्हान्स डिप्लोमा नि न्यूज प्रॉडक्शन आणि ॲडव्हान्स डिप्लोमा इन व्हीहिओ एडिटिंग हे तीन नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाअंतर्गत टिळक स्मारक मंदिर येथे पुण्यातील सर्वात मोठा ध्वनिमुद्रणाचा स्टुडिओ उभारण्यात आला आहे. यासाठी विद्यापीठाने ॲविड या लंडनस्थित आंतरराष्ट्रीय संस्थेशी सहकार्य करार केला आहे. या स्टुडिओसाठी लागणारी अत्याधुनिक उपकरणे अमेरिका, इंग्लंड व जर्मनी या देशांतून आयात करण्यात आली आहेत. तीन हजार स्क्वेअर फुटांचा हा स्टुडिओ असून, डबिंग, डॉल्बी पोस्ट प्रॉडक्शन, फॉली साऊंड अशा सर्व तांत्रिक सुविधा इथे उपलब्ध आहेत. तसेच प्रॉज उद्योग समूहातर्फे आर्थिक साहाय्य प्राप्त झाल्याने, एक अत्याधुनिक न्यूज प्रॉडक्शन स्टुडिओ उभारण्यात आला आहे. यात टीव्हीमध्ये काम करताना तांत्रिक कौशल्याची जी गरज असते, त्याचे सखोल ज्ञान या अभ्यासक्रमात देण्यात येणार आहे. विभागाचे एक यू-ट्यूब चॅनेलदेखील विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला आहे. विभागाला अनेक पुरस्कारदेखील मिळाले आहेत. टिळक महाराष्ट्र विद्यापीठचे गीतदेखील विद्यापीठाच्या स्टुडिओमध्ये, अवधूत गुप्तेंच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आले आहे. 'लोकमान्य टिळकांनी लोकशिक्षण आणि कार्यप्रवृत्त तरुण पिढी घडविण्याकरिता माध्यमांद्वारे प्रयत्न केले. मात्र येणाऱ्या काळात नव्या व जुन्या माध्यमांद्वारे तरूण पिढीला राष्ट्रीयत्व, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्राची प्रगती व नैतिकता यांचे भान ठेवून व्यवसाय करणे, ही दिशा विभाग प्रमुख व लोकमान्य टिळक यांची खापर पणती म्हणून देणे, हेच आव्हान आहे व त्यासाठी मला बळ द्यावे, हीच त्या ईश्वराकडे प्रार्थना!' अशा भावना कुलगुरू डॉ.गीताली टिळक यांनी व्यक्त केल्या आहेत. त्या यथार्थ आहेत. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या शतक महोत्सवी पर्वाला उदंड शुभेच्छा!

# ताज्या निवडणुकीचा अन्वयार्थ

**निवडणुकांचे निकाल हे खूप काही सांगत असतात. त्यांचा अन्वयार्थ मोठमोठ्या लेखांमधे सोडा, पुस्तकांमधेही सामावत नाही. कारण निकालात आकड्यांच्या पलीकडेही खूप गोष्टी असतात. त्यामुळे निकालांच्या चर्चेनंतरही उरलेले प्रत्येक निवडणुकांचं सार थोडक्यात सांगणारे हे पाच पाच मुद्दे.**



राजकारण

**सचिन परब**

२ मेचा रविवार आयपीएल मॅच बघत साजरा करण्याची स्वप्नं पाहणाऱ्या अनेकजण बघत होते. पण त्यापेक्षाही लक्षवेधी स्पर्धा विधानसभा निवडणुकांच्या निकालांमधे होती. त्यांनी फार धमाल आणली. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम ही चार राज्यं आणि पुद्दूचेरी या केंद्रशासित प्रदेशात झालेल्या निवडणुकांचे निकाल अनेक अर्थांनी महत्त्वाचे ठरले. त्याचं सार सांगणारे हे काही मुद्दे.

**पश्चिम बंगाल**

कणखर नेता असेल, अरेला कारे करणारी प्रचारयंत्रणा असेल आणि तळागाळातल्या लोकांशी घट्ट बांधिलकी असेल, तर नरेंद्र मोदी-अमित शहांच्या निवडणुका जिंकण्याच्या राक्षसी यंत्रणेला मोठ्या फरकाने हरवता येतं, हे छत्तीसगड, दिल्ली, झारखंडनंतर पश्चिम बंगालमधे दिसलं. विजय तेंडुलकरांचं कन्यादान नाटकातलं एक पात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता आहे. नाटकाचा बंगाली अनुवाद करताना त्याची पार्श्वभूमी कम्युनिस्ट दाखवलीय. पांढरपेशा डाव्या मतदारांचा अनुवादही मोठ्या प्रमाणात असा झाल्याचं आकडे सांगत आहेत. मागच्या विधानसभा निवडणुकांशी तुलना केल्यास भाजपला फायदा झालाय. लोकसभा निवडणुकांचा विचार केल्यास नुकसान झालंय. लोकसभेत भाजपकडे गेलेला डावे आणि काँग्रेसचा जुना मतदार काही प्रमाणात तृणमूलकडे आलेला दिसतोय. त्यातून अनेक राजकीय शक्यतांचा जन्म होऊ शकतो. पंतप्रधान एखाद्या रोड रोमियोच्या स्टायलीत भर सभांत 'दीदी ओ दीदी' म्हणत होते. त्याचा फायदा उचलल्यामुळे दीदींना महिला मतदारांची सहानुभूती मिळाली. ती निर्णायक आणि अपेक्षेपेक्षा मोठं यश देणारी ठरली. इतर पक्षांतले नेते फोडून बस्तान बसवण्याचं तंत्र भाजपला फायदेशीर ठरतंय. पक्षाबरोबर पक्षाच्या विचारांचाही नव्या प्रदेशांत चंचूप्रवेश होतो. हे बंगालमधेही दिसलं. पण बडे नेते भाजपमधे गेल्याने ममता बॅनर्जींना ॲंटिइन्कम्बन्सीचा फटका बसला नाही.

**आसाम**

आसामच्या सीमा ईशान्य भारतातल्या इतर सगळ्या राज्यांशी जोडलेल्या असल्याने इथला निकाल इतर सहा राज्यांवर प्रभाव टाकतो. आसाममधल्या सलग दुसऱ्या विजयाने संघ परिवाराचं ईशान्य भारतावर वर्चस्व गाजवण्याचं स्वप्न पूर्ण होतंय. सीएए आणि एनआरसी यांच्या विरोधात राज्यभर आंदोलनं झालेली असतानाही भाजपने प्रयत्नपूर्वक लोकमत आपल्या अजेंड्यावर आणण्याचा चमत्कार करून दाखवला. धार्मिक ध्रुवीकरणाचा प्लान बंगालमधे फसला पण आसाममधे यशस्वी झाला. काँग्रेसचं दिल्लीतलं हायकमांड निर्णयच घेत नाही. एकमुखी नेतृत्व उभं करून त्यांच्या पाठीशी ताकद लावत नाही. हा सार्वत्रिक अनुभव त्यांना आसाममधेही भोवला. त्यामुळे काँग्रेस आघाडीच्या मतांची टक्केवारी भाजप आघाडीपेक्षाही जास्त असताना पराभव पत्करावा लागला. छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी शेवटच्या टप्प्यात जबाबदारी घेऊन काँग्रेसला तोडीस तोड लढण्यासाठी उभं केलं. ते घोड्याला तलावाजवळ घेऊन गेले, पाणी घोड्यालाच प्यायचं होतं. जिंकण्यासाठी काँग्रेसला आसाममधे नवा भूपेश बघेल उभा करावा लागेल. काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वात भांडणं आहेतच. पण भाजपमधेही सध्याचे मुख्यमंत्री सर्बानंद सोनोवाल आणि अर्थमंत्री हेमंत बिस्वसर्मा यांच्यातला संघर्ष आहे. छोट्या राज्यांमधले हे संघर्ष राजकीय परिस्थिती अस्थिर बनवतात. त्याची चाहुल या निकालांमधे आहे.

**तामिळनाडू**

करुणानिधी आणि जयललिता यांच्या निधनानंतर नेतृत्वाच्या पोकळीत झालेल्या निवडणुकीने एमके स्टॅलिन यांची अखेर नवा नेता म्हणून प्रतिष्ठापना केली. भविष्यात अण्णाद्रमुकला करिश्मा असणारं नवं नेतृत्व मिळालं नाही तर अम्माच्या पुण्याईवर दीर्घकाळ पक्ष चालवता येणार नाही. अशा वेळेस इतर छोट्या पक्षांना किंवा एखाद्या नव्या पक्षाला मोठी संधी मिळू शकते. कमल हसनचं हसं झालं ते पाहता, रजनीकांत निवडणुकांत उतरले नाहीत, ते बरं झालं. मात्र आता रजनीकांत नव्या स्ट्रॅटेजीने पुढच्या निवडणुकीची आतापासून तयारी करू शकतात. मोदींच्या प्रत्येक तामिळनाडू दौऱ्यात गो बॅक मोदी असा हॅशटॅग चालवणाऱ्या तामिळनाडूने मतांमधेही तो हॅशटॅग पुढे चालवला. दिल्ली विरुद्ध राज्य हे गणित बंगालबरोबरच तामिळनाडूतही यशस्वी झालं. काँग्रेसला त्यातल्या त्यात समाधान मिळालं ते इथेच. द्रमुकसारखे स्थानिक पक्ष पकडून त्यांच्यासोबत निष्ठेने राहिल्याने त्यांना दीर्घकालीन फायदा मिळू शकतो.

**केरळ**

दक्षिणेच्या इतर राज्यांसारखा नेतृत्वाचा करिश्मा नाही. उत्तरेसारखं जात आणि धर्माच्या आधारावर मतांचं ध्रुवीकरण नाही. तरीही सरकारचं काम आणि विचारधारेच्या आधारे निवडणुका होऊ शकतात, हे केरळमधे दिसलं. पिनाराई विजयन यांच्या नेतृत्त्वात कोरोना नियंत्रणासाठी केलेलं कामासाठी मतदान झालं. त्यामुळे कोरोना हा फक्त इथेच निवडणुकीचा मुद्दा झाला. सोशल वेल्फेयर स्कीममुळे यश मिळतं हे बंगाल आणि आसाममधे दिसलं. पण त्याहीपेक्षा केरळमधे ते अधोरेखित झालं. खरंतर हे राहुल गांधींना लोकसभेत निवडून देणारं राज्य. इथे तरी एकमुखी बळकट नेतृत्व काँग्रेसकडे असायला हवं होतं. तिथल्या तीन गटांमधली गटबाजी रोखता आली नाही. माजी मुख्यमंत्री ओमन चंडींचा असंतोष थांबवता आला नाही. मेट्रोमॅन श्रीधरन यांचं बोट धरून केरळमधे दोनतीन जागा मिळवण्याचा भाजपचा प्रयत्न फसला. मागच्या विधानसभेत एक आमदार होता, तोही आता नाही. काँग्रेस बंगालमधे डाव्यांच्या सोबत आणि केरळमधे विरोधात होतं. त्याचं तर्कसंगत स्पष्टीकरण काँग्रेस आपल्या कार्यकर्त्यांपर्यंत पोचवू शकली नाही. राष्ट्रीय पातळीवर डाव्यांच्या सोबत असल्यामुळे स्थानिक काँग्रेसचा कार्यकर्ता सरकारच्या विरोधात त्वेषाने मैदानात उतरू शकला नाही.

**पुद्दूचेरी**

एनडीएच्या विजयामुळे भाजप दक्षिणेच्या तळातही शिरकाव करू शकलाय. पण ते घडलंय एन. रंगस्वामी या दहा वर्षांपूर्वी काँग्रेसमधून फुटून निघालेल्या नेत्याच्या पक्षामुळे. मुख्य ताकद एनआर काँग्रेसचीच आहे. भाजप फक्त सोबत आहे. इथलं सत्तापरिवर्तन भाजपने सत्तेच्या जीवावर केलं. काँग्रेसचे आमदार फोडले. साम दाम दंड भेद सगळे पवित्रे वापरलं आणि शून्यावरून सहा आमदारांवर उडी घेतली. राज्य विरुद्ध दिल्ली असं गणित होत असल्याचं लक्षात येताच भाजपने राज्यपालपदावरून किरण बेदींना हटवलं. रंगराजन यांच्या नेतृत्वात एनआर काँग्रेसपुढे दुय्यम भूमिका घेतली. अशी कोणत्याची रणनीतीतल्या सुधारणा काँग्रेसने केल्या नाहीत. त्याचा परिणाम निकालांमधे दिसला. काँग्रेसने आपल्या हातातलं हक्काचं राज्य घालवलं. माजी मुख्यमंत्री नारायणसामी निवडणूकही लढवत नव्हते, पण निवडणुकीचं नेतृत्व तेच करत होते. त्यामुळे नेतृत्वहीन काँग्रेसचं पानिपत झालं. त्यांना द्रमुकची भक्कम साथ असूनही फक्त दोन जागा जिंकता आल्या. एनडीएला आता पूर्ण बहुमत असलं, तरी तिथे सत्ता टिकवून ठेवण्याचं आव्हान भाजपकडे असणार आहे. तामिळनाडूच्या राजकारणाचा प्रभाव इथे असतो. तिथे द्रमुककडे सत्ता असल्यामुळे एनआर काँग्रेसला किंवा आमदारांना आपल्यासोबत ठेवताना भाजपची दमछाक होणार आहे.

(लेखक हे महाराष्ट्र,
गोव्यातील ज्येष्ठ संपादक आहेत.)

# 'ऑक्सिजन दूत' : प्यारे खान

**प्यारे खान यांचे नाव सध्या चर्चेत आहे. ते भारतातले टॉपचे ट्रान्सपोर्ट व्यावसायिक आहेत. रिक्षा चालक ते ६०० कोटींचा मालक हा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. सध्या ते आपला सगळा व्यवसाय सोडून कोरोनाविरुद्धच्या लढाईत उतरलेत. नागपूर आणि विदर्भातल्या अनेक हॉस्पिटलमधे आतापर्यंत त्यांनी ४०० मेट्रिक टन इतका ऑक्सिजन मोफत पोचवलाय. कोरोनाच्या संकटात 'ऑक्सिजन दूत' म्हणून सगळीकडे त्यांच्या नावाची चर्चा आहे.**

आज-काल

**अक्षय शारदा शरद**

प्यारे खान. आई-वडील, तीन भाऊ आणि बहीण असे त्यांचे कुटुंब. नागपूरमधल्या ताजबागच्या झोपडपट्टीत त्यांचे बालपण गेले. घरची परिस्थिती फार हलाखीची होती. दहावीत नापास झाले. पुढचे शिक्षण घेतील इतकी घरची परिस्थिती नव्हती. त्यामुळे शिक्षण अर्धवट राहिले. पेट्रोल पंप टाकण्यासाठी म्हणून त्यांना दहावी पास होणे गरजेचे होते. त्यामुळे पाच वर्षांपूर्वी त्यांनी पुन्हा दहावीची परीक्षा दिली. घर आणि पोटापाण्यासाठी म्हणून त्यांनी ऐन तारूण्यात मिळेल ते काम केले. ६ वर्ष रिक्षा चालवली. नागपूर रेल्वे स्टेशनच्या बाहेर संत्री विकली. गाड्या धुण्याचे काम केले. ते करताना मोठा व्यावसायिक व्हायचे स्वप्न पाहिले. त्यासाठी झटून मेहनत घेतली. आज देशातले टॉपचे ट्रान्सपोर्ट व्यावसायिक म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. पण हा प्रवास साधासोपा नक्कीच नाहीय.कोरोनाच्या सध्याच्या संकटात 'ऑक्सिजन दूत' म्हणून सगळीकडे त्यांच्या नावाची चर्चा आहे. जातीपातीची सगळी बंधने झुगारून या संकट काळात ते विदर्भात ऑक्सिजनची व्यवस्था करतायत. एकवेळचे जेवण नसेल तर आपण जगू पण आपला श्वास नसेल तर काय? असा प्रश्न ते विचारतायत. त्यामुळेच या संकटातून प्रत्येकाला वाचवण्यासाठी भारतीय होण्याचं कर्तव्य पार पाडायचे आवाहन त्यांनी केले आहे.

एकेकाळी कर्जासाठी पायपीट

वर्ष होते २००४. काहीतरी मोठे करायचे स्वप्न प्यारे खान यांना खुणावत होते. त्यासाठी पैशांची गरज होती. पण त्यांच्याकडे पैसे नव्हते. बँकेकडून कर्ज घेणे हा एकच पर्याय त्यांच्याकडे होता. त्यासाठी प्यारे खान वणवण भटकले. बँकांमधे पायपीट सुरू झाली. अर्ज, विनंत्या झाल्या. पण बँकांनी कर्ज नाकारले. हा नकार काही काळ चालूच राहिला. व्यवसाय उभा करायचा तर ११ लाख रुपयांची गरज होती. अशातच नागपूरच्या आयएनजी वैश्य बँकेने सकारात्मक प्रतिसाद दिला. बँकेचे अधिकारी घरी आले. पण झोपडपट्टीत राहत असल्याचे कारण देत त्यांना कर्जासाठी नकार देण्यात आला. दुसरा कुणी असता तर विषय सोडला असता. पण प्यारे खान यांनी हिंमत सोडली नाही. प्रयत्न करत राहिले.

पुन्हा दोन दिवसांनी त्याच बँकेकडून फोन आला. कर्ज दिलं तर वेळेत परतफेड कराल का असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. प्यारे खान यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना तशी हमी दिली. बँकेनंही त्यांच्यावर विश्वास टाकला. ११ लाखांचं कर्ज मंजूर करण्यात आलं. प्यारे खान यांचा प्रवास सुरू झाला. महत्वाचं म्हणजे कर्ज मंजूर करणारी त्या बँकेतली भूषण नावाची व्यक्ती आज त्यांचे आर्थिक व्यवहार पाहतेय.



'जोश टॉक्स' या शोमधे प्यारे खान म्हणतात, 'मी यश मिळेल की नाही याचा कधी विचारच केला नाही. कायम कामाबद्दल विचार करत राहिलो. कोणताही व्यवसाय छोटा नाही आणि धंद्यापेक्षा कोणताही धर्म मोठा नाही. भलेही छोट्यातला छोटा व्यवसाय असेल पण त्यात काहीना काही चांगलं करायचा प्रयत्न करायला हवा.'



अपघात ठरला टर्निंग पॉईंट

या पैशातून त्यांनी २००४ ला पहिला ट्रक विकत घेतला. त्या ट्रकमुळे रस्त्यावरची वाहतूक सुरू झाली. पण ६ महिन्यांनी अचानक ट्रकचा मोठा अपघात झाला. सगळं काही संपलं होतं. सगळंच उद्ध्वस्त झालं होतं. त्याचवेळी अनेक मित्रांनी त्यांना या व्यवसायातून बाहेर पडायचा सल्लाही देऊन टाकला. तुझ्याकडून आता काही होत नसतं असा नकारात्मक सूर आळवला. पण प्यारे खान डगमगले नाहीत.

जिथं ट्रकचा अपघात झाला तिथून तो उचलून थेट नागपूरला घेऊन आले. ड्रायवरला हॉस्पिटलमधे ॲडमिट केलं. एव्हाना ट्रक सोबत ड्रायवरही ठीकठाक झाला होता. दोघंही रस्त्यावर चालायला सज्ज झाले. हळूहळू अनेक ट्रक त्यांच्या दिमतीला आले. छोटं मोठं कामही त्यांना मिळालं. तसं आर्थिक उत्पन्न वाढू लागलं. त्याचवेळी ट्रक घ्यायचा सिलसिला चालू राहिला. २०१३ पर्यत हे सगळं चालू होतं.

एक आव्हान जगभर संधी

त्यांच्या ट्रान्सपोर्ट व्यवसायाचं काम वाढू लागलं. असंच एकदा भूतानमधलं काम घ्यायला भारतातल्या अनेक बड्या ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांनी नकार दिला. कारण त्या सामानाची साडे सतरा फूट उंची होती. भूतानमधे जिथून ते पलीकडे न्यायचं त्या गेटची उंची होती साडे तेरा फूट. गेट तोडून सामान तिथपर्यत घेऊन जायला ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांना हे शक्य वाटलं नाही. प्यारे खान यांनी हे आव्हान स्वीकारलं.

हे काम पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडे केवळ २४ तास होते. त्यांनी डोकं लावलं. प्यारे खान स्वतः भूतानला गेले. ज्या गेटवरून सामन पुढे पाठवायचे ती जमीन चार फूट खोल खोदण्यात आली. सामान पलीकडे म्हणजेच भूतान सरकारकडे पोचतं करण्यात आले. भूतान सरकारचा हा खूप मोठा प्रोजेक्ट होता. प्यारे खान यांनी हे आव्हान पूर्ण केल्यामुळे एक यशस्वी व्यावसायिक म्हणून त्यांची घोडदौड सुरू झाली. त्यांच्या कंपनीने मागे वळून पाहिले नाही. भूतानसोबत नेपाळ, बांगलादेश, दुबई सगळीकडे त्यांच्या ट्रान्सपोर्ट कंपनीने काम केलं. आजच्या घडीला आपल्याकडे २५० ट्रक असल्याचं 'जोश टॉक्स' या शोमधे त्यांनी सांगितलंय.

यशाचं गुपित कशात?

सध्या प्यारे खान 'अस्मी रोड ट्रान्सपोर्ट' या नावाने कंपनी चालवतायत. आज त्यांच्याकडे १२०० लोक काम करतायत. असे एका इंटरव्यूमधे त्यांनी म्हटलंय. २००१ मधे रिक्षा चालवून आपल्या दोन वेळच्या पोटाची खळगी भरणारा हा माणूस आज ६०० कोटींचा मालक आहे. छोट्या छोट्या गोष्टी मनासारख्या होत नसतील तर आपण हार मानतो. सगळं काही सोडून देतो. पण प्यारे खान हरले नाहीत.त्यांचं आयुष्य खाचखळग्यांनी भरलंय. पण दुर्दम्य इच्छाशक्ती, आत्मविश्वास, जिद्दीच्या बळावर त्यांनी यश आपलंसं केलं. या काळात त्यांना अनेकांच्या नकारघंटा ऐकाव्या लागल्या. कसं होईल, यश कसं मिळेल अशा अनेक नकारात्मक शेड्स उभ्या केल्या गेल्या. पण या नकारघंटेला त्यांनी स्वतः नकार दिला. अशा लोकांकडे दुर्लक्ष केलं. यातच त्यांच्या यशाची गुपितं दडलीत.

व्यवसाय सोडून कोरोनाच्या युद्धात

कोरोनाच्या या दुसऱ्या लाटेत देशभर ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण झाला. पेशंटचे नातेवाईक वणवण भटकत होते. देशातल्या अनेक शहरांमधे आजही ही स्थिती कायम आहे. महाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हता. नागपूर शहरात ऑक्सिजनअभावी लोकांचे मृत्यू होत होते. हे हाल बघून प्यारे खान पुढं आले. आपली बाकीची सगळी कामं सोडून त्यांनी ऑक्सिजनची व्यवस्था करायचं ठरवलं. मुस्लिम धर्मात रमजान काळात जकात म्हणजेच दानाला फार महत्व आहे. त्यामुळे ही 'ऑक्सिजन जकात' असल्याचं ते म्हणतात.

(पान ३ वर)

# लोकनेते सुंदरराव सोळंके कारखाना आता ऑक्सिजन निर्मितीत

## आमदार प्रकाश सोळंके यांची माहिती





▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यातील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे वतीने मे २०२१ अखेर २५ घनमीटर क्षमतेचा ऑक्सीजन निर्मीतीचा प्रकल्प लवकरच कार्यान्वीत होणार असल्याची माहिती कारखान्याचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री तथा आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली.

कारखान्याचा सन २०२०-२१ चा गळीत हंगाम दि.३ मे रोजी बंद झाला असून या हंगामात कार्यक्षेत्र व गेटकेन भागातील ८२१४७८ मे.टन उसाचे विक्रमी गाळप केले आहे. राज्यातील सध्याची कोविडची परिस्थिती विचारात घेता कोविड रूग्णांना मोठया प्रमाणावर ऑक्सिजनची गरज आहे. राज्य व केंद्र शासन ऑक्सिजन उपलब्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तथापि, राज्यात ऑक्सिजनची कमतरता मोठया प्रमाणावर भासत असून ऑक्सिजनचा पुरवठा रूग्णांना पुरेसा व वेळेत झाल्यास रूग्णांचा जीव वाचवण्यास मदत होणार आहे. राज्य व देशासमोर उभ्या राहिलेल्या मोठया संकटाचा सामना करण्यासाठी ऑक्सिजन निर्मितीसाठीचे प्रकल्प तातडीने उभे करण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे या संस्थेचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी व शासनाने साखर उद्योगास आवाहन केले होते. कारखान्याकडे सहवीज निर्मिती व आसवणी प्रकल्प असल्याने कारखान्यास ऑक्सिजन निर्मीती करणे शक्य आहे. या करीता संचालक मंडळाने १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्यसाधून व संकटकाळात सामाजिक योगदान म्हणून दैनिक २५ घनमीटर क्षमतेचा ऑक्सिजन प्लँट उभारणीचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. या आणीबाणीच्या परिस्थितीत ग्रामीण व निमशहरी भागाला चांगला लाभ होईल असे आमदार प्रकाश सोळंके म्हणाले.

# यंदा खरीपाची ७९ हजार हेक्टरवर होणार लागवड

## कृषी खात्याने व्यक्त केला अंदाज

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील कृषी विभागाकडून तालुक्यातील खरीप २०२१ ची तयारी करण्यात आली आहे. यंदाच्या वर्षी ७९ हजार हेक्टरवर पेरा अपेक्षित असून, त्यात कपाशीचा ३० हजार हेक्टरवर तर सोयाबीनचा २४ हजार हेक्टरवर पेऱ्याचा अंदाज कृषी विभागाकडून वर्तविला जात आहे.

माजलगाव तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र हे ९२ हजार हेक्टर असून, त्यापैकी ७८ हजार ९०० हेक्टरवर खरिपाचा पेरा अपेक्षित मानला जात आहे. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी खरिपाच्या क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. गतवर्षी खरिपाचे क्षेत्र हे ७७ हजार ६०० हेक्टर ऐवढे होते.

या वर्षी कापूस ३० हजार हेक्टर, सोयाबीन २४ हजार हेक्टर, ऊस १७ हजार हेक्टर, तूर ४ हजार ५०० हेक्टर तर बाजरी, मूग व उदीड मिळून ३ हजार ४०० हेक्टरवर पेरा होण्याची शक्यता आहे. मशागतीच्या कामास शेतकऱ्यांनी वेग दिल्याचे तालुक्यात दिसून येत आहे. शेतकरी आतापासूनची पेरणीचे नियोजन करत आहेत. कापसाच्या एका हेक्टरला पाच, याप्रमाणे एकूण दीड लाख पाकिटे तर ५ हजार ९४० क्विंटल बियाणे लागण्याची शक्यताही कृषी विभागाने वर्तविली आहे. या वर्षी मान्सून वेळेवर येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली असल्याने येथील कृषी विभागाने खरीप २०२१ची तयारी पूर्ण केली आहे.

# तेलगावात अवैध मद्याचा साठा जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; एकास अटक

▶ प्रतिनिधी

तेलगाव : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अंबाजोगाई पथकाने मंगळवारी दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील तेलगाव येथे धाड टाकली असता त्या ठिकाणाहून ७० हजार रूपये किंमतीची विदेशी दारू जप्त करण्यात आलेली आहे.

सध्या कोरोना विषाणू च्या प्रादुर्भावाने सर्वत्र लॉक डाऊन करण्यात आले असून अवैध मद्याची विक्री होऊ नये, याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागाची पथके जिल्हाभरात करडी नजर ठेवत आहे. मंगळवार दि.४ मे रोजी अंबाजोगाईच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने दिंद्रुड पोलीस स्टेशन हद्दीत गस्त घालत असताना तेलगाव ता.धारूर येथे रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत इसम



नामे दामोदर माणिक चव्हाण (वय २१ वर्षे) रा.तेलगाव, तालुका धारूर हा विदेशी मद्याचा साठा विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असल्याचे आढळून आले. त्याच्या ताब्यातून राज्य उत्पादन शुल्क विभागाने इम्पेरियल ब्ल्यू व्हिस्कीच्या १८९ मिलीच्या २४० बाटल्या व मॅक डॉवेल नंबर वन व्हिस्कीच्या १८९ मिली क्षमतेच्या २४९ बाटल्या असा एकूण ६९ हजार ६९० रूपयांचा विदेशी मद्याचा साठा हस्तगत केला. तसेच त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा,१९४९ चे कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सदर कारवाई परिविक्षाधीन उप अधीक्षक इंगळे, दुय्यम निरीक्षक अंबाजोगाई आल्हाट, जवान धस व पाटील व जवान-नि-वाहन चालक डुकरे यांनी केली.



# सामाजिक जाणीवा जपणारी पत्रकारिता चिरकाल टिकते

## 'विकासनामा'च्या प्रकाशनप्रसंगी ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांचे उद्गार

▶ प्रतिनिधी

तेलगाव : सामाजिक जाणीवा जपत केलेली पत्रकारिता चिरकाल टिकते असे गौरवोद्गार ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांनी गुरूवारी जनसामान्यांचा विकासनामा वृत्तपत्राच्या प्रकाशनप्रसंगी काढले.

या प्रकाशनाला अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांच्यासह 'जनसामान्यांचा विकासनामा'चे संपादक बालासाहेब फपाळ, पत्रकार भगीरथ तोडकरी, गोवर्धन बडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी 'जनसामान्यांचा विकासनामा'ची भूमिका बालासाहेब फपाळ यांनी मांडली. पुढे बोलताना ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले म्हणाले, सामान्य लोकांचे प्रश्न मोठ्या हिंमतीने मांडणे हे वृत्तपत्राचे काम आहे. वृत्तपत्रांनी वारकरी संप्रदायातील संत विचारांना अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. मात्र तसे होताना दिसत नाही, अशी खंतही बोधले महाराज यांनी व्यक्त केली. दरम्यान, कोरोनाचे सर्व नियम पाळून प्रकाशन झाले.



**ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांचा शुभ आशीर्वाद घेताना वर्तमानचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी**

# रक्तदान हेच श्रेष्ठदान : तहसिलदार वैशाली पाटील

## माजलगावात ४५ रक्तदात्यांचे योगदान; तलाठी, कोतवाल, महसूल संघटनेचा पुढाकार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : दुसऱ्या लाटेत उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या परिस्थितीत रूग्णासाठी कमी पडत असलेला रक्ताचा तुटवडा लक्षात घेता माजलगावच्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांच्या पुढाकाराने माजलगाव तलाठी संघटना, कोतवाल संघटना व महसूल कर्मचारी संघटना यांच्या वतीने शनिवारी महाराष्ट्र दिनी तहसिल कार्यालयात एक सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात स्वतः तहसिलदार यांच्यासह एकूण ४५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.



या रक्तदान शिबिरात माजलगाव तालुक्यातील मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल, लिपीक व माजलगाव तालुक्यातील रक्तदाते यांनी कोविड-१९ चे सर्व नियम पाळून सहभागी झाले होते. या रक्तदान शिबीरात स्वतः तहसीलदार वैशाली पाटील यांच्यासह ४४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबीराच्या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी केले. यावेळी मंडळ अधिकारी के.सी. पुराणिक, व्ही.एन. टाकणखार, पी.एस.मुळाटे यांची उपस्थित होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे, सचिव सुशिल शिलवंत, अव्वल कारकून माणिक साबणे, महसूल सहाय्यक गणेश जवादे, कोतवाल बाळासाहेब गलांडे आदींनी परिश्रम घेतले.

# श्री सिध्दनाथ यात्रा रद्द

▶ प्रतिनिधी

धारूर : तालुक्यातील जहागीरमोहा येथील जागृत देवस्थान असलेले श्री सिद्धनाथ देवस्थान येथे कोरोनाच्या महामारीच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षीप्रमाणेही याहीवर्षी श्री सिद्धनाथ मंदिर कमिटीच्या वतीने रद्द करण्यात आली आहे. यंदा दि.३ मे रोजी ही यात्रा भरली जाणार होती, मात्र कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ही यात्रा रद्द करण्यात आली आहे.

जाहागीरमोहा येथे श्री सिद्धनाथ मंदिर हे जागृत देवस्थान असून या ठिकाणी राज्यासह संपूर्ण जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने सर्वधर्मिय भाविक हजेरी लावत असतात. लोकसहभाग व कांदे परिवाराकडून सर्व भाविकभक्तांना अन्नदानही मोठ्या



प्रमाणात केले जाते.

यंदा सोमवार, दिनांक ३ मे रोजी मोठ्या उत्साहात भरणारी ही यात्रा श्री सिद्धनाथ मंदिर कमिटीचे सदस्य विश्वांभर मोहन कांदे, भगवान कांदे, माणिक गणपती कांदे, शिवाजी रामा कांदे, बाबासाहेब एकनाथ कांदे, नानाभाऊ भाऊराव कांदे, संपत्ती गणपती कांदे, सरपंच अविनाश कांदे आदींनी रद्द करण्यात आली असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. श्री सिद्धनाथ मंदिरात सोमवारी शासनाच्या आखून दिलेल्या कोरोना नियमांचे पालन करत पूजाअर्चा करण्यात आली, असल्याची माहिती यात्रा कमिटीने दिली.

# शेख ईसराईलचा पहिला रोजा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : बिलाल मोहल्ला



येथील शेख इसराइल शेख जहीर (वय ९ वर्ष) याने आपल्या जीवनातील पवित्र रमजान महिन्याच्या पहिला उपवास पूर्ण केल्यानी नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे. सध्या कडाक्याच्या उन्हाळ्यात रमजानचे रोजे (उपवास) आले असून इतक्या कमी वयात रोजा पूर्ण केल्याबद्दल अनेकांनी अभिनंदन केले आहे. ईसराईल हा एमआयएमचे शहराध्यक्ष शेख नजीर यांचा भाचा आहे.

पान २ वरुन

**'ऑक्सिजन दूत' :**

ऑक्सिजनचा टँकर केवळ सरकारला मागवता येतो. खासगी व्यक्तीला तो घ्यायचा तर त्यासाठी कोटा ठरलेला असतो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी कोरोना काळात व्यावसायिकांना मदतीसाठी पुढे येण्याचं आवाहन केलं होतं. प्यारे खान यांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. नितीन गडकरी आणि नागपूर प्रशासनाची टँकरसाठी मदत झाल्याचं त्यांनी आवर्जून म्हटलंय. आतापर्यंत त्यांनी ८६० ऑक्सिजन सिलेंडर दान केलेत. यातले ५०० सिलेंडर हॉस्पिटलना तर बाकी गरजू लोकांना देण्यात आलेत. नागपूर आणि त्याच्या आजूबाजूच्या सरकारी हॉस्पिटलमधे त्यांनी आतापर्यंत ४०० मेट्रिक टन इतका ऑक्सिजन पोचवलाय. प्रत्येक टँकरसाठी त्यांनी तिपटीने किंमत दिलीय. तर ऑक्सिजनसाठी ८५ लाख इतकी रक्कम खर्च केलीय. केवळ नागपूरपुरतं त्यांचं काम मर्यादित राहिलं नाही. पूर्ण विदर्भात ते पोचले. त्यांच्यामुळेच लोकांचे जीव वाचू शकले. मागच्या वर्षीच्या कोरोनाच्या संकटातही त्यांनी गरिबांसाठी, ड्रायवर्सना मोफत जेवणाची व्यवस्था केली होती.

ऑक्सिजन दूत काय म्हणतोय?

ऑक्सिजनच्या तुटवड्यावर भाष्य करताना अनेक महत्त्वाच्या सूचना केल्यात. जिकडे ऑक्सिजनची गरज नाहीय अशाच ठिकाणी ऑक्सिजन मोठ्या प्रमाणात जात असल्याचं प्यारे खान यांचं म्हणणं आहे. देशातल्या ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांनी पुढे यायला हवं. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रयत्न करायची विनंती त्यांनी केलीय.

देशात ऑक्सिजनचा साठा आहे. फक्त त्याचं नीट व्यवस्थापन व्हायला हवं. असं ते म्हणतायत. वाहतूक आणि संवाद या दोन्हींची कमतरता त्यांना जाणवतेय. जिथं ५ हजार लिटर लिक्विड हवंय तिथं ते १० हजार लिटर पोचतंय. टँकर्सवाल्यांना कोणत्या राज्यात किती मृत्यू होतायत याच्याशी काहीच देणंघेणं नाहीय. त्यांना पैश्याशी देणं आहे. त्यामुळे ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांना सरकारनं बोलावून त्यांच्याशी चर्चा करायला हवी असं प्यारे खान यांचं म्हणणं आहे.

'गरज नसताना ऑक्सिजनचे टँकर्स मागवले जातायत. लिक्विडची गरज कितीय हेसुद्धा ओळखायला हवं. त्यानंतर ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांना एकत्र बसवा. गरज असेल तर त्यांच्या गाड्या जप्त करा. हे देशाच्या हिताचं आहे. पैसा कमवायची ही वेळ नाहीय. ऑक्सिजन मॅनेज करता येऊ शकतं फक्त गरज नसताना जे ऑक्सिजनचे टँकर मागवले जातायत त्यावर कडक कारवाई करायला हवीय. तसंच विमान आणि रेल्वेने ऑक्सिजनची व्यवस्था करता येऊ शकेल.' असे प्यारे खान यांनी म्हटले आहे.





# वादळी वाऱ्यासह पावसाने डोंगरपट्टा झोडपला

## घरांची पडझड, पिकांची नासाडी; शेतकरी हवालदिल

▶ प्रतिनिधी

धारूर : दिवसेंदिवस चढता पारा, असह्य उकाडा असताना आणि वैशाख वणवा सुरू होण्याआधीच तालुक्यातील नागरिकांना मुसळधार पावसाचा अनुभव आला. रविवारी दुपारी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने नागरिक चक्रावून गेले. काही गावांना जोडणाऱ्या नदीवरील पुलावर पाणी वाहत होते. दरम्यान, या पावसामुळे फळबागा आणि भाजी पिकांचे मोठे नुकसान झाले असून अंजनडोह येथे वीज कोसळून एक बैल ठार झाला आहे.

तालुक्यात सतत तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस हजेरी लावत असल्याने नागरिक वैतागून गेले आहेत. रविवारी दुपारी दीड तास वादळी वारा आणि आणि विजेच्या कडकडाटा सह मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे नदी, नाले ओसंडून वाहत होते. कुंडलिका, वाण, सरस्वती नद्याही भरून वाहत होत्या. रूईधारूर, जहागीरमोहा, अंबेवडगाव येथे पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद झाली होती.

**'नुकसानीचे पंचनामे करा'**

वादळी वाऱ्यासह जोरदार झालेल्या अवकाळी पावसाचा मोठा तडाखा बसून मोठ्या प्रमाणात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. धारूर तालुक्यात झालेल्या नुकसानीचे शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान-भरपाई द्यावी अशी मागणी अविनाश कांदे, गोरख पुर्णे यांनी केली आहे.

# कोरोना नियम पाळा, अन्यथा दंड भरा

## माजलगाव पंचायत समितीचा सकारात्मक फंडा; १ लाख ३६ हजारांचा दंड वसूल

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही कोरोनाचे रूग्ण मोठ्याप्रमाणात वाढत असल्याने त्याला आळा घालण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाने ठोस उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. कोरोनाचे नियम मोडणाऱ्या नागरिकांकडून तब्बल एक लाख ३६ हजार १०० रुपयाचा दंड वसूल करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तालुक्यातील ६ ग्रामपंचायतीत २२ मिनी कंटेन्मेंट झोन तयार करण्यात आले आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पंचायत समिती कार्यालयांतर्गत अधिकारी, कर्मचारी काम करीत आहेत.

झपाट्याने वाढणाऱ्या कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाकडून ग्रामीण भागात ठोस उपाययोजना राबविण्यात येत आहेत. कोरोनाबाधित रूग्णांची संख्या जास्त असणाऱ्या सहा ग्रामपंचायतीत २२ मिनी कंटेन्मेंट झोन तयार करण्यात आले आहेत. कोरोनाचे नियम मोडणाऱ्या नागरिकांकडून महिनाभरात एक लाख ३६ हजार १०० रूपयाचा दंडही वसूल करण्यात आला असल्याची माहिती गटविकास अधिकारी प्रज्ञा माने यांनी दिली. बीड जिल्ह्यासह माजलगाव तालुक्यात झपाट्याने वाढणारा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत नसून दिवसेंदिवस कोरोनाबाधित रूग्णांची संख्या वाढतच जात आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात मोठ्याप्रमाणात वाढला असल्याने शासकीय कोविड सेंटर हाउसफुल्ल झाले आहेत. ग्रामीण भागात होणारा कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाकडून ठोस उपाययोजना राबविण्यात येत असून याबाबत नागरिकांत जनजागृतीही करण्यात येत आहे. रूग्णसंख्या जास्त असलेल्या तालुक्यातील सांडसचिंचोली, बेलुरा–आलापूर, नाकलगाव, मनुरवाडी, हारकी लिमगाव, नित्रुड ग्रामपंचायतीमध्ये २२ मिनी कंटेन्मेंट झोन तयार करण्यात आले असून, याठिकाणी प्रतिबंधक क्षेत्र म्हणून फलक लावण्यात आले आहेत. ग्रामस्थांनी नियमांचे पालन करावे असे आवाहन गटविकास अधिकारी प्रज्ञा माने यांनी केले आहे.

### गंगामसल्यात कोविड सेंटरला मान्यता : प्रज्ञा माने

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामीण भागात ठिकठिकाणी मिनी कंटेन्मेंट झोन तयार करण्यात आले आहेत. मोठ्या गावात शासकीय कोविड सेंटर उभारण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आले असून गंगामासला येथे परवानगी मिळाली आहे. पंचायत समितीमार्फत ठोस उपाययोजना करण्यात येत असून यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन गटविकास अधिकारी प्रज्ञा माने यांनी केले आहे.

## वाळू उपसा करणारी दोन वाहने ताब्यात

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील आडोळा येथे गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणारे दोन वाहने पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने सोमवारी (दि.३ मे) रोजी सुमारास छापा टाकून ताब्यात घेतले.

माजलगाव तालुक्यातील आडोळा येथील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती पोलीस अधीक्षक आर.राजा यांच्या पथकाचे प्रमुख सपोनि विलास हजारे यांना मिळाली होती. त्यावरून पथकाने सोमवारी सायंकाळी छापा टाकला. यावेळी दोन वाहनांमध्ये (क्र.एमएच ०४ इवाय ५००२ व एमएच १७ एजी ४५४५) १० ब्रास वाळू मिळून आली. हा सर्व २२ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी टिप्परचालक शेख नसिब शेख अजीज (रा.पिंपळगाव, ता.माजलगाव) व सलाम खालीद अन्सारी (रा.पाथरी, जि.परभणी) व दोन्ही वाहनांचे मालक या चौघांविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार बालाजी बास्टेवाड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माजलगावात लसीकरण केंद्रे वाढवा

## कचरू खळगे यांची प्रशासनाकडे मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना महामारीचे थैमान रोखण्यासाठी तालुक्यात लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. परंतू माजलगाव ग्रामीण रूग्णालयात लसीकरणासाठी लोकांची एकच गर्दी होत असून या गर्दीमुळे कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता असल्याने ही रूग्णालयातील गर्दी टाळण्यासाठी शहरात लसीकरणाची आणखी एक–दोन केंद्रे सुरू करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस कचरू खळगे यांनी



जिल्हाधिकारी रविंद्र जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी आर.बी.पवार यांच्याकडे केली आहे.

माजलगाव तालुक्यासह शहरात दिवसेंदिवस कोरोना रूग्णांची संख्या वाढत चालली आहे. राज्य सरकारने लॉकडाऊन करूनही रूग्ण संख्या कमी होण्याचे नाव घेत नाही. त्याचबरोबर देशात कोरोनाची संभाव्य तिसरी लाट येणार असल्याचे भाकीत केले जात आहे. त्यामुळे लोकांना सुरक्षित राहण्यासाठी लसीकरण मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्यामुळे लोकांत योग्य अंतर न ठेवणे या नियमावलीचे पालन होत नसल्यामुळे कोरोनाचा संसर्ग यामुळे वाढु शकतो. यामुळे आरोग्य विभागाने शहराच्या मध्यभागी अजून एक लसीकरण केंद्र सुरू करावे. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस कचरू खळगे यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

### मंगलबाई धायगुडे यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सराफा व्यापारी



भागवतराव धायगुडे यांच्या पत्नी मंगलबाई भागवतराव धायगुडे (वय ५५ वर्षे) यांचे शुक्रवार दि.७ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती भागवतराव, दोन मुले गणेश आणि विजय, सुना, एक मुलगी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. धायगुडे परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# पत्रकार फ्रंटलाईन वर्कर कधी होणार;देशमुख यांचा सवाल

▶ प्रतिनिधी

बीड : विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय व तिसऱ्यांदा पश्चिम बंगालची सत्ता मिळवल्यानंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गेल्या सोमवारी एक घोषणा केली. या पुढे आता पश्चिम बंगालमधील सगळे पत्रकार देखील करोना योद्धे असणार आहेत.



मी सर्व पत्रकारांना कोविड योद्धा असं घोषित करते. असं मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी माध्यमांसमोर जाहीर केलं आहे. याशिवाय आज मध्यप्रदेश सरकारने देखील सर्व मान्यताप्राप्त पत्रकरांना फ्रंट लाईन वर्कर घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. तर, ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांनी देखिल, श्रमिक पत्रकारांना फ्रंटलाईन कोविड वॉरियर्स म्हणून घोषित केलं आहे.

महाराष्ट्र सरकारनं मात्र राज्यातील पत्रकारांना वाऱ्यावर सोडले आहे. अर्ज, विनंत्या, आंदोलनं आणि आत्मक्लेष करूनही राज्य सरकारवर त्याचा फरक पडत नाही. राज्य सरकार हेतुतः पत्रकारांची उपेक्षा करीत असल्याचा आरोप एस.एम. देशमुख यांनी केला आहे.

### ॲड.प्रमोद तौर यांचे कोरोना लढ्यात योगदान

# रूग्ण, नातेवाईकांना मोफत डबे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना साथीने गेल्या वर्षेभरापासून संपूर्ण जगात थैमान घातले आहे. या साथी मध्ये आर्थिक व्यवस्था ढासळली आहे. तर काही लोक वेगवेगळ्या पध्दतीने लूट करीत असताना तर समाजातील दानशूर आपल्या परिस्थितीने तितक्याच ताकतीने मदतीसाठी धावताना दिसत आहेत. त्याच पध्दतीने कोरोना साथीमध्ये रूग्णांसाठी आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी माजलगाव येथील वकील प्रमोद तौर यांनी गरजुवंताना मोफत जेवणाचा डबा पोहच करून अडचणीच्या काळात खारीचा वाटा उचलत आहेत.



सामाजिक बांधिलकीची भावना बाळगूण माजलगाव जिल्हा व सत्र न्यायालयातील ॲड.प्रमोद तौर यांनी खेडयापाडयातील गोरगरीब कोरोनाग्रस्त रूग्णांना ज्यांना जेवणाची अडचण असेल त्यांना मोफत जेवनाचा डबा पोहच करण्याचा सेवा संकल्प हाती घेतलेला आहे. हा उपक्रम ॲड.प्रमोद तौर यांनी माणुसकीच्या भावनेतून हाती घेतले असून सर्वस्तरातून त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक होत आहे.




## वर्तमान हेल्पलाईन

### माजलगावातील महत्त्वपूर्ण क्रमांक

| | |
|---|---|
| शिवभोजन | ७७०९०९१६१६ |
| न.प.पाणी पुरवठा | ९६६५३६६३४५ |
| जीवनदायी ब्लड बँक | ९१७२५७९४७१ |
| शासकीय रूग्णालय | ९४२२९३२५०७ |
| वीज वितरण | ८४११००२१३३ |
| योगायोग गॅस एजन्सी | ९९२१२८००९७ |
| शहर पोलीस ठाणे | ९४२३५३०५०० |
| ग्रामीण पोलीस ठाणे | ०२४४३ २३४०३३ |
| दिंद्रुड पोलीस ठाणे | ०२४४३ २४४५३३ |

## माजलगावातील ॲब्युलन्स सेवा



| | |
|---|---|
| शासकीय रूग्णालय | १०८ |
| शिवसेना | ९७६४६७३१७१ |
| अलफलाह कमिटी | ९४२१०६१७१० |
| रोटरी क्लब | ७७४४८२२१०८ |
| यशवंत हॉस्पीटल | ७५५८७१७२०९ |
| देशपांडे हॉस्पीटल | ९८२३९२१११२ |
| श्री सिध्देश्वर संकुल | ९४०३६०७४७९ |
| सफा बैतुल माल | ९३२५२५२५६३ |
| नागनाथ कार्डियाक | ८८३०२३९११९ |

जनहितार्थ : वर्तमान

## आई



माया ममतेची माऊली
होती घराची सावली

घेतले नऊ महिने उदराला
जग दाखवले तू मला
धरून आई तुझ्या हाताला
मी शिकले चालायला

जीवापार तु
लाविला तू लळा
तुझ्या मायेची
आठवण येते मला
तु राहून उपाशी स्वतः हा
खाऊ घालत होतीस आम्हा

तुच असे माझी प्रेरणा
तुच जीवनाचे सार
कधी रूसू नको माझ्यावर
आता आहे तुझाच आधार

आई माझी आहे थोर
काय सागू तिचे उपकार
शीतल असे तिची माया
मला हवी जीवनभर

**: कु.एखंडे लक्ष्मी रामेश्वर**

# दुचाकी झाली विक्री केंद्र

## साळेगाव येथील शेतकरी भागवत मुळेंचा आदर्श उपक्रम

▶ प्रतिनिधी

केज : कोरोना वैश्विक संकटामुळे मोठ्या उद्योगधंद्यासह छोट्या व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे. अशा परिस्थितीत साळेगाव येथील शेतकरी भागवत नवनाथ मुळे यांनी खरबूज विक्रीसाठी नामी शक्कल लढविली आहे. आपली दुचाकी खरेदी केंद्र बनवून ग्राहकांचे लक्ष वेधून घेतले आहे. दरम्यान, मुळे यांच्या खरबूजाला ग्राहकांमधून वाढती मागणी होत आहे.

शेतात ३–४ महिने कष्ट करून पिकविलेला माल विक्रीसाठी तयार झाला. मात्र त्यात कोरोना महामारी आडवी आली. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी लॉकडाऊन असल्याने आता हा माल शेतात सडून परवडणारे नव्हते. म्हणून एका खरबुज पिकविण्याणाऱ्या शेतकऱ्याने चक्क दुचाकीवरच खरबूज विक्रीचे फिरते दुकान थाटले. खेडोपाडी व गावोगाव फिरून ते विक्री करीत आहेत. केज तालुक्यातील साळेगाव येथील भागवत मुळे या युवकाने आपल्या शेतात सव्वा एकर क्षेत्रात खरबुजाची लागवड केली. त्याला खतपाणी, फवारणी व अंतर मशागत करून पीक जोमाने वाढविले; परंतु ऐन खरबुज विक्रीला येणार तोच महाराष्ट्रात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने डोके वर काढले. त्यामुळे सर्वत्र लॉकडाऊन करण्यात आले. मात्र आता हाता–तोंडाशी आलेल्या या खरबुजची करायचे काय? हा प्रश्न भागवत मुळे यांच्या पुढे उभा राहिला.



कारण हे फळ नाशवंत आहे.

फळ तोडणी नंतर काही दिवस भागवत मुळे याने एक माल वाहतूक करणारे छोटा हत्ती सारखे वाहन भाड्याने करून परिसरात खरबुज विक्री सुरू केली. पण भाड्याचे वाहन परवडत नव्हते. मग त्यांनी दुचाकीलाच दोन्ही बाजुला व मागे एक असे लोखंडी हँगर बनवून त्यात प्लॅस्टिकचे मोठे कॅरेट ठेवून त्यात सुमारे एक क्विंटल माल घेऊन व एक इलेक्ट्रॉनिक वजन काटा सोबत घेऊन त्यांनी केजसह कळंब परिसरात खरबूज विक्री सुरु केली आहे. आतापर्यंत त्यांनी २ लाख ८० हजार रूपयांचे खरबूज विक्री केले आहे. यातून त्यांना उत्पन्न मिळाले आहे. मात्र जर लॉकडाऊन नसते आणि मार्केट खुले असते तर निश्चितच आणखी याहीपेक्षा जास्त फायदा झाला असता. मात्र जर मेहनत आणि जिद्द असेल तर कोणत्याही संकटावर मात करून यशस्वी होता येते. हे भागवत मुळे यांनी दाखवून दिले आहे. 'सध्या मुस्लिम बांधवांचा रमजानचा उपवासाचा महिना सुरू असून कडक उन्हाळा असल्याने खरबुजाला मागणी आहे, असे भागवत मुळे सांगतात.'



## अबब...लस घेण्यासाठी जाताय का कोरोना?

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील ग्रामीण रूग्णालय येथे कोरोनाची



लस घेण्यासाठी आलेल्या नागरिकांची धावपळ होत असून मोठी तारांबळ उडत आहे. आरोग्य विभागाचे व प्रशासनाचे कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही. यामुळे प्रश्न असा निर्माण होतोय की जनता लस घेण्यासाठी जातेय ती कोरोना घेण्यासाठी? असा प्रश्न निर्माण होत आहे या धावपळीमुळे खूप मोठी गर्दी होत आहे. माजलगाव शहरात लस केंद्रे वाढवण्यात यावेत अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

आरोग्य विभागाने व प्रशासनाने घरोघरी जाऊन किंवा वार्ड वाईज लस केंद्र सुरू करून सर्वांना लस द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुका उपाध्यक्ष गोविंद देशमाने यांनी प्रशासनाला व आरोग्य विभागाला लेखी निवेदन देऊन केली आहे.सदर लसीच्या नोंदणी प्रक्रियेतील त्रुटी दूर करून लसीच्या केंद्रावर गर्दी होऊ नये. यासाठी लसीकरण केंद्र वाढवावेत, अशी मागणी गोविंद देशमाने यांन केली आहे.

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.